Fe/Ecd/15-16/56115
22/3/16

# सर्व धर्म परिषद आयोजन

आपल्या भारत देशात अनेक धर्म-पंथाचे लोक आनंदाने राहतात. अनेक धर्मियांचा धर्मनिरपेक्ष, लोकशाही व समाजवादी देश म्हणून भारताची ओळख आहे. विविधतेतून एकता हे भारत देशाचे वैशिष्ट्य आहे.

सध्या धर्माबद्दल सत्य असल्याची सरमिसळ होवून जनतेमध्ये संभ्रमावस्था निर्माण केली जात आहे. सातत्याने धार्मिक भावना कलूषित होण्याचा प्रकार घडत आहे. म्हणून मानवता हाच खरा धर्म आहे. जगातील प्रत्येक धर्माचा पाया मानवता हाच आहे. अहिंसा, सदाचार, सत्य, असत्ये, सहिष्णूता, बंधुभाव याची शिकवण धर्मातून केली जाते. जगातील विविध धर्माची तत्वे समान आहेत. म्हणून धर्माधर्मातील धार्मिक भावना वृध्दींगत व्हावी यासाठी विविध धर्मातील धर्मगुरुंनी, विचारवंतांनी एकत्र येऊन विचारांची देवाण-घेवाण करणे आवश्यक आहे. आपल्या धर्मातील मानवी मूल्ये जपणारी विचारधारा सर्वधर्मपरिषदेतून धर्मगुरूंनी मांडणे गरजेचे आहे. धार्मिक सलोखा राखण्यासाठी त्याची खूप गरज आहे.

जगातील प्रश्न हे हिंसेने सुटत नाहीत. एकमेकांची मने जिंकल्यास मानवी जीवन आनंदी व सुसह्य बनते. संस्कृतीचा उदो-उदो करत त्याच्या खाली विकृती दडू पाहते आहे. या विकृतीला बाजूला काढण्यासाठी धार्मिक वैज्ञानिक दृष्टिकोनाची खूप गरज आहे. अनिष्ट रुढी व अंधश्रध्दा या गोष्टी पुन्हा डोके वर काढू पहात आहेत. मानवी जीवन आनंदी बनण्यासाठी धर्मातील वैज्ञानिक तत्वे रुजण्याची गरज आहे. समाजात बंधुभाव रुजावा एकमेकांच्या धर्माबद्दल आदर राखला जावा. मानवतावादी विचारांची भावना व्यापक बनावी. यासाठी सर्व धर्मातील लोकांनी एकत्र येवून आपल्या धर्माचे चांगले विचार सर्वांपर्यंत पोचवण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी सर्वधर्म परिषदेचे नियोजन केले आहे.

वा. संदेश

यासाठी धर्म-संस्कृती, शांतता व ऐक्य या विषयावर आपण आपले प्रेरणादायी विचार लेखातून मांडावेत ही नम्र विनंती आपले बहुमूल्य विचार श्री.एम.बी.मुडबिद्रीकर, ११६८, ई वॉर्ड, टाकाळा, कोल्हापूर ४१६००८ या पत्त्यावर किंवा mbmsir@rediffmail.com यावर द्यावेत किंवा ९५०३९७०९९३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क केल्यास लेख स्विकारण्याची व्यवस्था केली आहे.

आपले विनीत

श्री. बी.एस.मुडबिद्रीकर शास्त्री चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर

प्रति,

मा. कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ.

Registrar
I/c. V.C

5 APR 2016

UCE